**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**

**महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ च्या** अंतर्गत मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याकडून विवाह नोंदणीच्या कामाकाजाबाबतची प्रमाणभूत कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्रशासन राजपत्र रजि.नं.एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९ दि.२०.०५.९९ अन्वये बृहन्मुंबईत विवाह नोंदणीचे कामकाज ए ते टी विभाग कार्यालयातून दि. ५ मार्च, २०१० पासून सुरु करण्यात आले आहे. तसेच नागरिकांना विवाह नोंदणी विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामध्ये प्रत्यक्ष जाऊन अथवा ऑनलाईन प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

**विशेष विवाह अधिनियम १९५४ अंतर्गत महाराष्ट्रशासनाचे विवाह अधिकारी व विवाह निबंधक मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयात नोंदणीकृत होतात.**

**<u>नागरिकांच्या माहितीसाठी:-महानगरपालिकेमध्ये विवाह नोंदणी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.</u>**

- फक्त महाराष्ट्र राज्यात संपन्न झालेल्या विवाहाकरीता.
- ज्ञापनासोबत सर्वसाधारण स्थितीत सम धर्मिय (हिंदू व मुस्लिम) वधु वरांसाठी पुढी दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे.
- पारसी, ख्रिश्चन व ज्यू या धर्मियांची नोंदणी या कायाद्यअंतर्गत करण्यात येत नाही.
- वर वा वधु यांच्या राहण्याचे ठिकाण विवाह निबंधकाच्या कार्यकक्षेत असणे आवश्यक आहे.

विवाह नोंदणीचे प्रत्येक ज्ञापन (अर्ज) नमुना 'ड' मध्ये पूर्ण भरुन देणे आवश्यक आहे.

| अनु. | मुद्दा | पुरावे/दस्तऐवज | कार्यवाही | अधिकारी/ कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १ | वर व वधु यांच्या वयाचा पुरावा (पुढीलपैकी कोणतेही एक आवश्यक) | १.शाळा सोडल्याचा दाखला<br>२.पासपोर्ट<br>३.जन्माचा दाखला<br>४.एस.एस.सी परिक्षेचे प्रमाणपत्र<br>५.अधिवास दाखला | १.पुराव्यांची साक्षांकीत छायांकीत प्रत उपलब्ध करणे<br><br>२.पुराव्यांची मूळ प्रत नोदंणीच्या वेळी पडताळणीसाठी सादर करणे | विवाह नोंदणी करणारा कर्मचारी |
| २ | वर व वधु यांचा राहण्याचा पुरावा(पुढीलपैकी कोणतेही एक आवश्यक)<br>विशेष सुचना:-वधुच्या लग्ना अगोदरचा रहाण्याचा पुरावा असणे आवश्यक आहे. | १.रेशन कार्ड<br>२.इलेक्शन कार्ड<br>३.पासपोर्ट<br>४.लाईट बिल (अर्जदाराच्या नावे)<br>५.टेलिफोन बिल (अर्जदाराच्या नावे)<br>६.इतर | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | तीन साक्षीदारांचे रहिवास पुरावे (पुढीलपैकी कोणतेही एक आवश्यक) | १.रेशन कार्ड<br>२.इलेक्शन कार्ड<br>३.पासपोर्ट<br>४.इतर | | |
| ४ | लग्नपत्रिका | १.लग्नपत्रिका नसल्यास रु.१००/- स्टॅप पेपरवर जॉईंट डिक्लरेशन | | |
| ५ | वर, वधु व साक्षीदारांचे फोटो | १.वर व वधु यांचे पासपोर्ट साईज प्रत्येकी ३ फोटो<br>२.तीनही साक्षीदारांचे प्रत्येकी एक फोटो | | |
| ६ | ज्ञापन/अर्जावरील अनु.क्र.७ मधील आवश्यक माहिती | विवाह संपन्न करणा-या पुरोहित/भटजी /काझी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. | | |
| ७ | वर व वधु व ३ साक्षीदार यांच्या स्वाक्ष-या | विवाह निबंधकासमोर एकाच वेळी व्यक्तीश: उपस्थित राहून स्वाक्ष-या करणे आवश्यक आहे. | | निबंधक /वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| विशेष बाबीत विवाह नोंदणी (वरील सर्व दस्तऐवजा व्यतिरिक्त अतिरिक्त दस्तऐवज | | | | |
| १ | पक्षकार घटस्फोटीत असल्यास | १.न्यायालयाचा हुकुमनामा | | विवाह नोंदणी करणारा कर्मचारी |
| २ | पक्षकार विधुर / विधवा असल्यास | १.नगरपालिकेचा मृत्युदाखला | | |
| ३ | मुस्लिम धर्मिय वर वधु | १.निकाह नाम्याची अधिकृत इंग्रजी भाषांतरीत प्रत | | |
| ४ | भिन्न धर्मिय (हिंदू/मुस्लिम फक्त) | १.वधु अथवा वर यांचे स्वेच्छेने धर्मांतर केल्याबाबतचे धर्मांतरीत व्यक्तीचे प्रतिज्ञापत्र.<br>२.वधु अथवा वर यांचे धर्मांतर ज्या व्यक्तीने केले त्याचे प्रतिज्ञापत्र<br>३.वधु व वर एकधर्मिय झाल्यानंतर दोघांचे संयुक्त प्रतिज्ञापत्र. | सर्व तीन्ही प्रतिज्ञापत्रे विवाहाच्या दिनांकापुर्वी पक्षकारांपैकी एकाच्या नावे तसचे धर्मांतर करणा-या पंडीत/ काझी यांच्या नावे असलेल्या रु.१००/- स्टॅप पेपरवर आवश्यक | |

## विवाह नोंदणी करिता आकरण्यात येणारे नोंदणी शुल्क

| अनु. | नियम | बाब | शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ५ (२) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | ५०/- |
| २ | ७ (१) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या ९० दिवसानंतर परंतु १ वर्ष पुर्ण होण्यापूर्वी विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | १००/- |
| ३ | ७ (१) | विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतर १ वर्षाहून वा त्याहून अधिक कालावधीने विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | २००/- |
| ४ | ११ (१) | विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी सोबत द्यावयाचे शुल्क | १५/- |
| ५ | ११ (२) | विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळण्यासाठी अर्जासोबत द्यावयाचे शुल्क | २०/- |

**टिप:**-१.विशेष विवाह अधिनियम १९५४ अन्वये कलम ५ अंतर्गत दाखल नोटीसीतील (वधु किंवा वर) एक परकीय नागरिक असल्यास नोंदणी अधिकारी कार्यक्षेत्रात निवास करणारी व्यक्ती कलम ५ अन्वये नोटीस दाखल करु शकते. त्यापैकी एक पक्षकार परकीय नागरीक असल्यास त्याचा जन्म दाखला व निवास पुरावा दाखला मुळ पत्र विवाह संपन्न होण्यापुर्वी पडताळणी केली जाते. तसेच महाराष्ट्र विवाह अधिनियम १९९८ अंतर्गतही प्रत्येक विवाह कार्यालयातही नोंदणी होऊ शकते.

२. महाराष्ट्र विवाह अधिनियम १९९८ अधिनियमांतर्गत नोंदणी होऊ न शकणारे विवाह, विशेष विवाह अधिनियम १९५४ अंतर्गत महाराष्ट्रशासनाचे विवाह अधिकारी व विवाह निबंधक मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयात नोंदणीकृत होतात.

**सही/-**
**कार्यकारी आरोग्य अधिकारी**